**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स रेडिको एन. व्ही. डिस्टिलरीज महाराष्ट्र लिमिटेड, प्लॉट नं. डी-१९२ ते डी-१९५, पंचतारांकित औद्योगिक वसाहत शेंद्रा, तालुका आणि जिल्हा-औरंगाबाद, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात नवीन २००.० केएलपीडी धान्यावर आधारित आसवणी प्रकल्प उभारून सध्याच्या २०० केएलपीडी आसवणी प्रकल्पाचा (१४० केएलपीडी मळी/धान्य आणि ६० केएलपीडी धान्यावर आधारित) विस्तार करून ४०० केएलपीडी धान्यावर आधारीत आसवणी प्रकल्प करण्याचा आणि त्यासोबत नवीन ५.५ मेगावॅट सहनिर्मिती ऊर्जा केंद्र उभारुन सध्याच्या ३.० मेगावॅट सहनिर्मिती ऊर्जा केंद्राचा विस्तार करुन ८.५ मेगावॅट सहनिर्मिती ऊर्जा केद्र करण्याचा प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत-**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स रेडिको एन. व्ही. डिस्टिलरीज महाराष्ट्र लिमिटेड, प्लॉट नं. डी-१९२ ते डी-१९५, पंचतारांकित औद्योगिक वसाहत शेंद्रा, तालुका आणि जिल्हा-औरंगाबाद, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात नवीन २००.० केएलपीडी धान्यावर आधारित आसवणी प्रकल्प उभारून सध्याच्या २०० केएलपीडी आसवणी प्रकल्पाचा (१४० केएलपीडी मळी/धान्य आणि ६० केएलपीडी धान्यावर आधारित) विस्तार करुन ४०० केएलपीडी धान्यावर आधारीत आसवणी प्रकल्प करण्याचा आणि त्यासोबत नवीन ५.५ मेगावॅट सहनिर्मिती ऊर्जा केंद्र उभारुन सध्याच्या ३.० मेगावॅट सहनिर्मिती ऊर्जा केंद्राचा विस्तार करुन ८.५ मेगावॅट सहनिर्मिती ऊर्जा केद्र करण्याचा प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी सोमवार, दिनांक, १४ मार्च, २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आली होती.

जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी दिनांक ०४-०२-२०२२ च्या कार्यालयीन टिप्पणीव्दारे पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास सोमवार, दिनांक, १४ मार्च, २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- १६ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी- २२०२१७-एफटीएस-०१६५ दिनांक १७-०२-२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) श्री. सुनील चव्हाण, भाप्रसे - **अध्यक्ष**
जिल्हादंडाधिकारी,औरंगाबाद

२) डॉ. प्रवीण जोशी, - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद

३) श्री अर्जुन राठोड - **समन्वयक**
प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद

श्री अर्जुन राठोड, प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री सुनील चव्हाण,भाप्रसे, जिल्हादंडाधिकारी, औरंगाबाद तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, डॉ. प्रवीण जोशी, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, औरंगाबाद तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

सर्वप्रथम समन्वयक यांनी सूचित केले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री अर्जुन राठोड यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मेसर्स रेडिको एन. व्ही. डिस्टिलरीज महाराष्ट्र लिमिटेड, प्लॉट नं. डी-१९२ ते डी-१९५, पंचतारांकित औद्योगिक वसाहत शेंद्रा, तालुका आणि जिल्हा-औरंगाबाद, महाराष्ट्र यांचा कार्यरत प्रकल्पात नवीन २००.० केएलपीडी धान्यावर आधारित आसवणी प्रकल्प उभारून सध्याच्या २०० केएलपीडी आसवणी प्रकल्पाचा (१४० केएलपीडी मळी/धान्य आणि ६० केएलपीडी धान्यावर आधारित) विस्तार करुन ४०० केएलपीडी धान्यावर आधारीत आसवणी प्रकल्प करण्याचा आणि त्यासोबत नवीन ५.५ मेगावॅट सहनिर्मिती ऊर्जा केंद्र उभारुन सध्याच्या ३.० मेगावॅट सहनिर्मिती ऊर्जा केंद्राचा विस्तार करुन ८.५ मेगावॅट सहनिर्मिती ऊर्जा केद्र करण्याचा प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी संदर्भात पर्यावरण विषयक संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज दिनांक २९-११-२०२१ रोजी प्राप्त झाला.

त्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी देशातील तसेच जिल्ह्यातील कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन सदर पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेताना राज्य सरकारच्या कोव्हीड-१९ संदर्भातील मार्गदर्शक तत्वाच्या अधीन राहून जसे की सोशल डिस्टनस, तोंडावर मास्क व हॅण्ड सॅनेटायझरचा वापर करुन सदर सुनावणी दि. २१.०१.२०२२ रोजी घेण्याबाबत आदेशीत केले होते. त्या अनुषंगाने या बातची रितसर जाहीर सुचना दि. २०/१२/२०२१ रोजीच्या दै. सकाळ (मराठी) व द टाईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी) या वृत्त पत्रामध्ये प्रकाशित करण्यात आली होती.

तद्नंतर मा. जिल्हादंडाधिकारी तथा उपरोक्त पर्यावरण विषयक लोकसुनावणीचे अध्यक्ष यांनी दि. ०७.०१.२०२२ रोजी सदर दि. २१.०१.२०२२ रोजी आयोजित केलेली जाहीर लोकसुनावणी ओमायक्रॉन कोविड-१९ च्या साथीची परिस्थिती असल्यामुळे पुढिल आदेश होईपर्यंत स्थगित करण्याबाबतचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने या कार्यालयाने दि. १४.०१.२०२२ रोजीच्या

दै. सकाळ (मराठी) व द टाईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी) या वृत्त पत्रामध्ये अशा प्रकारची सुचना प्रकाशित करण्यात आली होती.

या नंतर सदर उद्योगाच्या दि. ०३.०२.२०२२ च्या विनंती अर्जानुसार मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी यांनी दि. ०४.०२.२०२२ रोजी सदर स्थगित केलेली पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दि. १४.०३.२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता उपरोक्त उद्योगाच्या आवारात घेणे बाबतचे आदेश दिले.

त्या अनुषंगाने या कार्यालयाने दि. १०.०२.२०२२ रोजीच्या दै. सकाळ (मराठी) व द टाईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी) या वृत्त पत्रामध्ये सदर सुनावणी दि. १४.०३.२०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता उपरोक्त उद्योगाच्या आवारात घेणे बाबतची सुचना प्रकाशीत केली.

तसेच, पर्यावरणीय आघात मुल्यांकन अभ्यास अहवाल (मराठी व इंग्रजी), कार्यकारिणी सारांश (मराठी व इंग्रजी) च्या प्रती परिसरातील संबधित ग्रामपंचायत कार्यालयामध्ये ग्रामपंचायत कार्यालय, हिरापुर, शेंद्रा कमंगर, कुंभेफळ, लाडगांव, करमाड, टोणगांव, जडगांव, वडखा, वरझडी, गंगापुर शेंद्रा, दुधड, भांबरडा, ता. जि. औरंगाबाद. या १२ ग्रामपंचायतीमध्ये त्याच प्रमाणे इतर शासकीय कार्यालय जसे, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद, जिल्हा परिषद, औरंगाबाद, तहसिलदार, तहसिल कार्यालय, औरंगाबाद, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद, प्रादेशिक कार्यालय व उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ कार्यालय, औरंगाबाद, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), सायन मुंबई, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई, प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नागपुर या ठिकाणी नागरीकांच्या अभ्यास/अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. सदर प्रकल्पासंबंधी नागरिकास पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका-टिप्पणी तसेच आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत उप-प्रादेशीक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ औरंगाबाद येथे नोंदविण्यात याव्यात अशी विनंती करण्यात आलेली होती.

या अनुषंगाने अद्याप पर्यंत या कार्यालयास उपरोक्त प्रस्तावित प्रकल्पाबाबत एकूण ०५ सूचना प्राप्त झाल्या आहेत.

सदर ०५ सूचना अनुक्रमे श्री. शंकर रेड्डी, ग्रीन सोशल सर्व्हिस सोसायटी, हैद्राबाद यांची सुचना दि. २४.२.२०२२, श्री. रंगाराव कोथाकोंडा, सेव्ह अर्थ मेट्रो अर्बन ॲण्ड रुरल डेव्हलपमेंट सोसायटी, रंगारेडी, तेलगंणा यांची सूचना दि. ११/०३/२०२२, श्री. नविनकुमार पल्ले, युनायटेड सोशल सर्विस सोसायटी नाळगोंडा हैद्राबाद यांची सुचना दि. १३/०३/२०२२, श्री. मधुबाबु, रुरल एन्व्हॉयरमेंट एज्युकेशन अँड हेल्थ अवेअरनेस सोसायटी, हैद्राबाद यांची सुचना दि. १३/०३/२०२२ व श्री एम. बच्चन, एन्व्हॉयरमेंट पोल्युशन कंट्रोस अवेअरनेस सोसायटी यांची सूचना दिनांक १४-०३-२०२२ रोजी ई-मेल द्वारे या कार्यालयास प्राप्त झालेल्या असुन सदर सुचने मध्ये त्यांनी निव्वळ नफयाच्या

५ टक्के रक्कम सिएसआर साठी राखीव ठेवावी. तसेच परिसरातील नागरिकांन करिता मेडीकल कॅम्प घेण्यात यावे. तसेच रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष रोपण करण्यात यावे असे सुचित केले.

सदर ०५ सूचनांची दखल घेऊन उपरोक्त उद्योगास योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविल्या आहेत. यो खेरिज इतर कुठल्याही सुचना, टिका-टिप्पणी तोंडी किंवा लेखी स्वरुपात (ईमेलव्दारे) आतापर्यंत या कार्यालयास प्राप्त झालेल्या नाहीत.

तरी सदर प्रकल्पाबाबत आजच्या जाहीर लोकसूनावणी दरम्यान सुद्धा आपणास काही पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका-टिप्पणी करावयाच्या असतील तर त्याबाबत आपणास मौखिक किवा लेखी स्वरुपात आक्षेप नोंदविता येतील. तसेच, याठिकाणी आपण फक्त/केवळपर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत जेणे करून यावर योग्य ते मार्गदर्शन, शंका समाधान प्रकल्प धारकाकडून करण्यात येउन त्यांची नोंद घेण्यात येईल व सदरील बाबीची नोंद इतिवृता मध्ये करण्यात येईल तसेच सदर जाहीर लोकसूनावणीची video recording (चित्रफित) करण्यात येत असून ती जशीच्या तशी पर्यावरण, वने व हवामानातील बदल मंत्रालय, नवी दिल्ली येथे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग अ ५ (जी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे. समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक ०९-०९-२०२१ रोजी प्रदान केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे प्रतिनिधी श्री पाटील यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली.

त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापनासाठी एकूण गुंतवणूक रुपये - २१६.५ कोटी असेल असे सांगितले. सदरहू प्रकल्पात निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याकरिता अद्यावत औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प केंद्र उभारणार असल्याचे सांगितले. ज्यामध्ये डिकॅन्टर, मल्टी इफेक्टस इव्हॅपरेटर, कन्डेन्सेट पॉलिशिंग युनिट (सी..पी.यु.) लावणार

असून यामध्ये प्रक्रिया केली जाईल व प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर केला जाईल. तसेच आसवणी प्रकल्पातून निघणारे सांडपाणी/स्पेंट वॉश वर बायोमिथिनेशन, एम.ई.ई. कॉन्सन्ट्रेशन व कंपोस्टमध्ये प्रक्रिया केले जाईल व सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज/ शून्य द्रव निःस्सारण असेल.

प्रकल्प प्रतिनिधी यांनी सांगितले की प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च हा १३.० कोटी असेल.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप, टीका टिप्पणी लेखी व तोंडी करण्याचे आवाहन करण्यात आलेः-

**खालील् व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

**१) श्री सुधीर मुळे, राहणार-कुंभेफळ, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-**

हा कारखाना कुंभेफळ शिवारात येतो. येथे एक धरण वोखार्ड कंपनीच्या आवारात आहे. एमआयडीसी आणि म.प्र.नि.मंडळ यांना आम्ही वारंवार एक सूचना केली की एमआयडीसीतील प्रदूषित पाणी, सांडपाणी या धरणात येऊन देऊ नये. आमच्या गावातील पिण्याचे पाणी संपुर्णपणे दूषित झालेले आहे. मागच्या वर्षी याबाबत बैठक झालेली होती, त्यावेळी एमआयडीसी आणि म.प्र.नि.मंडळ यांनी सहा महिन्यात सांडपाण्याची व्यवस्था करण्याचे अभिवचन दिलेले होते. त्यावेळी एमआयडीसी आणि म.प्र.नि.मंडळाचे अधिकारी, विविध कारखान्याचे उच्चपदस्थ यांनी सांगितले की सांडपाण्याचा एकही थेंब धरणाच्या पाण्यात मिसळून दिला जाणार नाही. आजसुध्दा सांडपाणी, प्रदूषित पाणी धरणात मिसळते. आम्हांला विविध उदयोगांनी सांगितले की आम्ही एमआयडीसीला पैसे देतो, त्यामुळे एमआयडीसीने ते व्यवस्थापन केले पाहिजे. तरीही सांडपाण्याचे व्यवस्थापन केले जात नाही. ते दुर्लक्षित आहे. एमआयडीसीत भूमीगत गटारे नाहीत. ते पाणी धरणात जाते आणि कुंभेफळ गावातच धरण आहे. त्यावेळी असेही ठरले होते की जर आम्ही सांडपाण्याची व्यवस्था करु शकलो नाही, तर डीएमआयसीत (Delhi Mumbai Industrial Corridor) व्यवस्था आहे. ते पाणी आम्ही तिकडे वळवू असे आश्वासन देण्यात आलेले होते. काहीही झालेले नाही. आमच्या गावाला कोणताही धोका होऊ नये ही जबाबदारी एमआयडीसी, म.प्र.नि.मंडळ आणि जिल्हाधिकारी यांची आहे.

श्री मुळे यांनी पुढे सांगितले की एमआयडीसीत कारखाने आले पाहिजे, लोकांना रोजगार मिळालाच पाहिजे, पण ते कारखाने निसर्ग खराब करत असतील, तर ते योग्य नाही. ते सांडपाणी कोणत्या कंपनीचे आहे, याचा शोध एमआयडीसी, म.प्र.नि.मंडळ यांनी घ्यायला पाहिजे, पण त्या सांडपाण्याचा एकही थेंब आमच्या गावात येऊ नये. हे आश्वासन आम्हां ग्रामस्थांना लेखी स्वरुपात देण्यात यावे. कोणत्याही कारखान्याबाबत ग्रामस्थांची वैयक्तिक तक्रार नाही.

प्रकल्प प्रतिनिधी श्री पाटील यांनी केलेल्या सूचनेबाबत स्पष्टीकरण देताना सांगितले की सदरहू जनसुनावणी ही प्रस्तावित नवीन धान्यावर आधारित आसवणी प्रकल्प उभारुन सध्याच्या २०० केएलपीडी आसवणी प्रकल्पाचा विस्तार करुन ४०० केएलपीडी धान्यावर आधारित आसवणी प्रकल्प, सहवीज प्रकल्पाचा विस्तार यासाठी आहे. नवीन आसवणी प्रकल्प हा धान्यावर आधारित असून सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण/झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे. प्रकल्प प्रतिनिधी यांनी सांगितले की श्री मुळे यांनी उपस्थित केलेले मुद्दे रास्त असू शकतात. तरी नवीन प्रस्तावित प्रकल्पाविषयी आपण पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदवू शकता. यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प अधिकारी यांना सांगितले की आपल्या कारखान्यातून सांडपाणी बाहेर जाते वा नाही एवढीच माहिती द्यावी. त्यावेळी प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की आमचा कार्यरत आसवणी प्रकल्पातून कुठल्याही प्रकारचे सांडपाणी बाहेर जात नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी एमआयडीसीत सामुहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा योजना कार्यान्वित आहे काय याबाबत विचारणा केली. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले प्रत्येक कारखान्याची वैयक्तिक घरगुती व औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा अस्तित्वात आहे अशी माहिती दिली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की एकाही कंपनीचे पाणी प्रकल्पाबाहेर जाता कामा नये. त्यांनी बैठकीत आश्वासन दिले की याबाबत निश्चितच तपासणी करण्यात येईल व पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**२) श्री सुभाष ठोंबरे, राहणार-आडगांव खुर्द, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-**

प्रकल्प विस्तारिकरणामुळे शेतकरी म्हणून आम्हांला काही फायदा होईल? सीएसआर निधितून काही कामे करणार का?

प्रकल्प प्रतिनिधी यांनी उत्तर दिले की ही धान्यावर आधारित आसवणी प्रकल्प असून प्रक्रियेनंतर डीडीजीएस उत्पन्न् होते, ते पशूखाद्य म्हणून वापरता येते. आपण जर दुग्ध व्यवसाय करत असाल तर आपणास ते स्थानिक स्तरावर उपलब्ध होऊ शकते.

तसेच सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे कंपनीची वाढ झाल्यानंतर सीएसआर निधीत वाढ होऊन परिसरात सामाजिक उपक्रम राबविता येतील.

**३) श्री अशोक काकडे, राहणार-वडखा, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-**

श्री अशोक काकडे यांनी सांगितले की प्रकल्पापासून ४-५ कि.मी, अंतरावर गांव आहे. त्यांनी विनंती केली की विस्तारिकरण प्रकल्पात स्थानिकांना/भूमीपुत्रांना जास्तीत जास्त रोजगाराची संधी देण्यात यावी.

प्रकल्प प्रतिनिधी यांनी उत्तर दिले की जसे रोजगार उपलब्ध होतील त्याप्रमाणे कुशल, अर्धकुशल, अकुशल संवर्गात स्थानिकांना संधी देण्यात येईल. त्यांनी सांगितले की कार्यरत प्रकल्पात आपण स्थानिकांनाच रोजगाराची संधी दिलेली आहे.

४) श्री भाऊसाहेब नेमाणे, राहणार-गंगापुर शेंद्रा, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-

श्री भाऊसाहेब मेमाणे यांनी विनंती केली आमच्या जमिनी एमआयडासीमध्ये अधिग्रहित झालेल्या आहेत. तरीही स्थानिक असून आम्हांला रोजगाराच्या संधिपासून वंचित ठेवण्यात येते. तरी कारखान्यास विनंती आहे की त्यांनी त्यांच्या भूखंडातील थोडीशी जागा उद्योग करण्यासाठी उपलब्ध करण्यात यावी. तरी विस्तारिकरण प्रकल्पात आम्हांला रोजगाराची संधी देण्यात यावी.

यावेळी प्रकल्प प्रतिनिधी यांनी सांगितले की रोजगाराच्या संधिचा विचार कौशल्यावर आधारित उपलब्ध पदांनुसार करता येऊ शकतो. अगोदरच सांगितल्याप्रमाणे स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल.

५) श्री प्रकाश वाघ, राहणार-जडगांव, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-

श्री प्रकाश वाघ यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की जडगाव येथे जी नदी आहे, त्यातील पाणी पूर्णपणे पिवळसर, लालसर दिसते. ते पाणी आरोग्यास घातक आहे. तरी पिण्याचे पाणी आम्हांला एमआयडीसीकडून उपलब्ध करण्यात येऊन आमचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यात यावा. त्याचप्रमाणे पर्यावरण संरक्षणासाठी १० कि.मी. परिघात वृक्षलागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात यावा.

प्रकल्प अधिकारी यानी सांगितले की हा प्रश्न प्रस्तावित प्रकल्पाशी संबधीत नाही. तसेच नदी मध्ये प्रस्तावित प्रकल्पामुळे पाणी जाण्याचा प्रश्नच उदभवत नाही व वृक्ष लागवडी साठी संबधितांना पुर्ण सहकार्य करण्यात येईल.

६) श्री प्रभाकर बाबूराव काकडे, राहणार-दुधड, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-

श्री प्रभाकर काकडे यांनी सांगितले की येथे आमच्या ग्रामपंचायतीचे सदस्य उपस्थित असून ते दुधड गावाच्या वतीने बोलत आहेत. त्यांनी सांगितले की हा प्रकल्प शेतीवर आधारित कच्च्या मालावर आहे. तर शेतक-यास या प्रकल्पाचा फायदा होऊ शकतो का व असल्यास आपल्याजवळ काय योजना आहेत याबाबत खुलासा करण्यात यावा.

प्रकल्प अधिकारी यांनी माहिती देताना सांगितले की पूर्वी उत्तर दिल्याप्रमाणे सदरहू प्रकल्प हा धान्यावर आधारित आसवणी प्रकल्प असून प्रक्रियेनंतर डीडीजीएस उत्पन्न् होते, ते पशूखाद्य म्हणून वापरता येते. त्यात चांगल्या प्रमाणात प्रोटीन्स उपलब्ध आहेत. आजही कार्यरत आसवणी प्रकल्पातील डीडीजीएसला चांगली मागणी असून

विस्तारिकरणानंतर डीडीजीएस हे मोठ्या प्रमाणात उत्पन्न होईल. त्यामुळे मागेल त्यांना ते पुरवता येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की विस्तारिकरण प्रकल्पात मक्यापासून स्पिरिट तयार करणार आहेत. आता कार्यरत प्रकल्पात ६०.० मेक्ट्रीक टन मका लागतो. विस्तारिकरण प्रकल्पात अतिरिक्त मका लागेल. तर येथील शेतकरी, सिल्लोड, औरंगाबाद, फुलंब्री येथे मका पिकवितात. त्याचप्रमाणे आजूबाजूच्या शेतक-यांनी मका पिकविल्यास या प्रकल्पामुळे मका बाजारात विकण्याचा जो प्रश्न आहे तो प्रश्न सुटेल. एमएसपी (Minimum Support Price-MSP) प्रश्न सुटून मक्याच्या भावाला स्थिरता येईल. प्रकल्पात प्रक्रिया केल्यानंतर उत्पन्न् होणारे डीडीजीएस पशूखाद्य म्हणून वापरता येईल. तयार झालेले पशुखाद्य कमी भावात मिळेल. त्यामुळे दुग्धव्यवसायाला मदत होईल. त्याचा फायदा त्यामुळे शेतक-यांचा बाजाराचा प्रश्न हा काहीअंशी मिटेल. प्रकल्प अधिका-यांनी तुटलेला तांदुळ, ज्वारी चालेल असे सांगितले आहे. त्याला भाव मिळेल.

**७) श्री सोनाजी हरिभाऊ शेळके, स्थानिक भूमीपुत्र -**

श्री सोनाजी हरिभाऊ शेळके यांनी आक्षेप नोंदविला की या प्रकल्पात माझ्या आजोबांची २० हेक्टर जमिन गेलेली आहे. तसेच आपल्या कंपनीला लागून ३५० एकर जमिन पडून आहे. तेथे आपण हरितपट्टा विकसित करण्याचा उपक्रम हाती घेणार का? त्यांनी पुढे प्रश्न विचारला की विस्तारिकरण प्रकल्पात मी भूमीपुत्र असल्याने मला रोजगाराची संधि मिळेल काय?

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की प्रकल्पात १२० व्यक्तींना रोजगाराची संधि आहे. विविध संवर्गातील पदांवर त्यांच्याकडे असलेल्या शैक्षणिक व कौशल्याप्रमाणे स्थानिकांना प्राधान्य दिले जाईल.

त्यावेळी श्री शेळके यांनी आक्षेप नोंदविला की ज्यावेळी आमच्या जमिनी प्रकल्पासाठी अधिग्रहित करण्यात आल्या, त्यावेळी शासनाने शासकीय निर्णय (G.R.) दिलेला आहे की ज्याचा कंपनीसाठी भूखंड जाईल, त्या व्यक्तीस त्या कंपनीत कायमस्वरुपी नोकरी मिळेल. प्रकल्प अधिकारी यांनी येथे सांगितले की संबंधित व्यक्तीस एखादे विशिष्ट पद देण्यासाठी त्याच्याजवळ विशिष्ट कौशल्य आवश्यक आहे.

यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की संबंधित व्यक्ती ही प्रकल्पग्रस्त आहे. तरी संबंधित व्यक्तीस कौशल्य विकासांतर्गत शिकाऊ उमेदवार (Apprentice) म्हणून प्रकल्पात नोकरीची संधि देता येऊ शकते. त्यांना प्रशिक्षण भत्ता (Stipend) देता येतो. तरी संबंधित प्रकल्पग्रस्त व्यक्तींना संधि देण्यात यावी.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली की सदरहू विस्तारीकरण प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित होण्यासाठी कमीतकमी एक-दीड वर्ष

लागेल. तरी ज्यांची जमिनी तुमच्या प्रकल्पात गेल्या, त्या सर्वांना त्यांच्या क्षमते नुसार प्रशिक्षित करण्यात यावे. तदनंतर पात्रता व मागणी पाहुन प्राधान्याने संधी दयावी.

**८) श्री भरत आहेर, राहणार-टोणगाव, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-**

श्री आहेर म्हणाले की बैठकीत सांगण्यात आले की या विस्तारिकरण प्रकल्पामुळे शेतक-यांचा फायदा होईल. तरी आपणास जो कच्चा माल लागेल, त्यासाठी आपण शेतक-याबरोबर आगाऊ करार (prior agreement) करु शकता का?जेणेकरुन शेतक-यासही अंदाज येईल.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की धान्य प्रकल्पास लागणार आहे. पण त्याबाबतचे धोरण (Policy) आम्ही ठरविलेली नाही. तरी तुमच्यासारखे स्थानिक शेतकरी जर आले, तर आम्हांलाही अंदाज येऊ शकेल. त्याअनुषंगाने प्रकल्प व्यवस्थापन निश्चितच विचार करेल. प्रकल्प अधिकारी यांनी पुढे उत्तर दिले की आगाऊ करार करण्यात प्रकल्प प्रशासनास काही अडचण येणार नाही, कारण प्रकल्पात ६५० टन रोज कच्चा माल लागणार आहे. त्यामुळे स्थानिक शेतक-यांकडून माल घेणे कंपनीला फायद्याचेच आहे.

**९) श्री महेश भोसले, राहणार-कुंभेफळ, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-**

श्री महेश भोसले म्हणाले की प्रकल्प प्रवर्तक सांगतात की कार्यरत प्रकलपसुध्दा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे. पावसाळ्यात पाऊस पडल्यानंतर वाहणारे पाणी हे प्रकल्पातील घाण घेऊनच नदीपात्रात येते. त्यावर आपण उपाय योजना करणार का?

त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की चर्चेत अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांनी सांगितले की एमएसपी वर मका खरेदी करावा लागतो. तर कंपनीने कधिही एमएसपी वर मका खरेदी केलेला नाही. जर त्यांनी दिला, तर निश्चितच पंचक्रोशीतील शेतकरी हे मक्याचे पीक लावतील.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की स्थानिक शेतकरी हे आमच्याकडे याबाबत आलेले नाहीत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे मत मांडले की जर प्रकल्प प्रवर्तकांना व्यवसाय करायचा आहे, तर स्थानिक शेतक-यांना समर्थन केल्याशिवाय आपणास पर्याय नाही. त्यांनी प्रकल्पाचे संचालक यांनी सांगितले की आपणास एमएसपी प्रमाणे कच्चा माल विकत घ्यावा लागेल त्याचे अभिवचन देण्यात यावे. यावेळी प्रकल्पाचे संचालक यांनी तसे अभिवचन दिले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित शेतक-यांना सूचना केली की त्यांनी Farmers' Producer Organization (FPO) तयार करण्यात यावी. ती संस्था (एफपीओ) नोंदणीकृत करण्यात यावी. त्याव्दारे कंपनीशी व्यवहार करण्यात यावा.

अध्यक्ष यांनी मत मांडले की उद्योगधंदे वाढले पाहिजेत, त्याचप्रमाणे शेतकरीही जगलाच पाहिजे. शेतक-यांचा कच्चा माल हा एमएसपी प्रमाणे विकत घेण्यात यावा.

श्री महेश भोसले यांनी पावसाच्या पाण्याबाबत उत्तर देण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की बंधारा टाकन पूर्णपणे पाणी अडविण्यात आलेले आहे. त्यामुळे पाणी जात नाही. आपण याबाबत समक्ष बघून खात्री करु शकता.

यावेळी आयोजक यांनी उपस्थितांना त्यांच्या काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले.

१०) येथे परराज्यातील व्यक्तीने आक्षेप नोंदविण्यास सुरवात केली असता सदस्य व अध्यक्ष यांनी संबंधित व्यक्तीस लेखी निवेदन सादर करण्याची सूचना केली.

**११) श्री भरत बनसोडे, राहणार-कुंभेफळ, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-**

श्री भरत बनसोडे यांनी विस्तारिकरण प्रकल्पासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले की ते एक भूमीपुत्र आहेत व तरी आपल्या कंपनीत रोजगार वा कंपनीस सेवा पुरविण्याचा व्यवसाय असल्यास स्थानिक तरुणांना संधि देण्यात यावी. जेणेकरुन आम्ही त्यातून प्रगती करु. कुंभेफळ गावाच्या शेतक-यांना जर आगाऊ अवगत करण्यात आले तर त्याप्रमाणे ते पीक घेतील.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ज्याच्या जमिनी आपल्या प्रकल्पात गेल्या, त्यांची यादी तयार करण्यात यावी. सदस्य यांनी मत मांडले संपूर्ण प्रकल्प कार्यान्वित होण्यासाठी एक-दीड वर्षे लागणार आहेत. प्रकल्पग्रस्तांना कौशल्यविकास मार्फत प्रशिक्षण देण्यात यावे. त्यांना रोजगाराची संधि देऊ शकतात. सदस्य यांनी पुढे सांगितले की अध्यक्ष यांनी सांगितल्याप्रमाणे शेतक-यांची Farmers' Purchasing Organization (FPO) तयार करण्यात यावी. ती संस्था (एफपीओ) नोंदणीकृत करण्यात यावी. त्यामुळे कच्चा माल हा टनामध्ये विकता येईल.

**१२) श्री गणेश चौधरी, उपसरपंच, टोणगाव ग्रामपंचायत, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-**

डीएमआयसीचे केमिकलचे पाणी सुखना धरणात येते. त्या सुखना धरणात २०-२५ गावांच्या पिण्याची पाण्याची योजना आहे. तरी केमीकलचे पाणी बंद झाले पाहिजे. नाहीतर आम्हांला डीएमआयसीतूना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की २-३ व्यक्तींनी धरणाबाबत प्रश्न उपस्थित केले. मी स्वतः याबाबत लक्ष घालेन. आम्ही कुठल्याही परिस्थितीत धरणाचे पाणी खराब होऊ देणार नाही. त्यांनी सांगितले की जिल्हाधिकारी म्हणून माझे त्यावर लक्ष व नियंत्रण राहील. कुठल्याही कंपनीचे पाणी हे प्रकल्पाबाहेर जाणार नाही याचा खात्री बाळगा.

**१३) श्री कल्याण भोसले, राहणार -जडगाव, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-**

श्री कल्याण भोसले यांनी कंपनीचे नियम पाळून स्थानिकांना रोजगाराची संधि देण्याचे आश्वासन दिले. त्यांनी पुढें सांगितले की कंपनी नेहमी झाडे लावण्यात पुढाकार घेते. तरी आणखी करावे ही विनंती. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत स्तरावर एक समिती तयार करण्यात यावी.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की जे झाडे वाटप करतो, त्याऐवजी प्रत्यक्ष जाऊन लावण्यात येतील.

**१४) श्री भगवान निवृत्ती जाधव, राहणार - टोणगाव, तालुका व जिल्हा - औरंगाबाद-**

त्यांनी प्रश्न विचारले की बॉयलरमधून जो धुर निघतो त्याबाबत काय उपाययोजना करण्यात येतील?.

प्रकल्पाचे अधिकारी यांनी सांगितले की प्रकल्पात ईएसपी सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. सदस्य यांनी मत मांडले की प्रकल्पास OCEMS राबवावी लागेल. जर प्रकल्पाने नियम पाळले नाही तर पुढील कार्यवाही करण्यात येते.

आयोजक यांनी अध्यक्ष यांना समारोपाचे दोन शब्द बोलण्याची विनंती केली.

अध्यक्ष यांनी बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सर्व मुद्द्याचा ऊहापोह केला. त्यांनी सांगितले की ज्यांच्या जमिनी प्रकल्पासाठी गेल्या, त्यांना प्रशिक्षण प्रकल्प प्रवर्तकांकडून देण्यात यावे. जिल्हाधिकारी म्हणून ते प्रधानमंत्री कोशल्य विकास योजने अंतर्गत प्रशिक्षण देण्यास तयार आहेत. त्यांना सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. त्यांनी सांगितले की याची नोंद इतिवृतान्तात घेण्यात यावी. बैठकीत पिण्याच्या पाण्याची काळजी बाबत मुद्दे उपस्थित करण्यात आलेले होते. काहींनी मुद्दा मांडला की सांडपाणी हे बाहेर सोडण्यात येते. त्याची तपासणी करण्यात येईल. सर्व उपस्थितांनी मत मांडले की प्रकल्प उभारले पाहिजेत, मात्र पर्यावरणाचे हानी होता कामा नये. हरितपट्टा विकसित करताना कंपनीचा सहभाग घेण्यात येईल. अध्यक्ष यांनी मत मांडले की विकासाला कोणीही विरोध केला नाही. उद्योगांची गरज लक्षात घेऊन जिल्हाधिकारी कार्यालय व रॅडिको कंपनी कडुन प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतील. शेवटी माननीय अध्यक्ष यांनी सर्व गावक-यांचे उपस्थित राहून चर्चेत भाग घेतल्याबद्दल आभार मानले.

**१५) श्री भुजंग चौधरी, राहणार-दुधड, तालुका आणि जिल्हा-औरंगाबादः-**

त्यांनी सांगितले की रॅडिको कंपनीने फिल्टर प्लँट दिलेला आहे. त्यांनी कंपनीला धन्यवाद दिले.

सदस्य यांनी उपस्थित श्री सांदि[illegible] त्यांचे लेखी निवेदन देण्याची सूचना केली.

उपरोक्त सुनावणी दरम्यान उप[illegible]वादी सेवाभावी संस्थांच्या प्रतिनिधींनी माननीय अध्यक्ष व.सदस्य यांच्या आवाहना[illegible]२३ सूचना/आक्षेप सादर केलेल्या असून त्या सोबत जोडल्या आहेत. त्यावर अभ्यास क[illegible]ा सुचनांचा विचार करण्यात येईल असे प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले.

सरतेशेवटी सौ. सीमा मांगुळकर, क्षेत्र अधिकारी, मप्रनि मंडळ, औरंगाबाद यांनी जनसुनावणी समितीचे, उपस्थित ग्रामस्थांचे, प्रकल्प प्रतिनिधींचे व उपस्थित पर्यावरणवादी संस्था, पत्रकार यांचे आभार मानले व माननीय अध्यक्षांच्या परवानगीने सदरील पर्यावरणविषचक जाहिर जनसुनावणीचे कामकाज संपन्न् झाल्याचे घोषित केले.

सुनावणी दरम्यान उपस्थितांनी प्रकल्पाबाबत कोणत्याही प्रकारचे विराधी मत व भुमिका मांडली नाही. त्यामुळे सदर प्रकल्प उभारणीस शिफारस करण्यात येत आहे.

**(अर्जून राठोड)**
आयोजक ,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ औरंगाबाद,

**(डॉ. प्रवीण एम. जोशी),**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, औरंगाबाद

**(सुनील चव्हाण, भाप्रसे),**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
जिल्हादंडाधिकारी, औरंगाबाद जिल्हा- औरंगाबाद